# मार्गताम्हणे कॉलेज मधील विद्यार्थी गिरवतायत सायबर शिक्षणाचे धडे

**मार्गताम्हाणे /वार्ताहर :**

सध्या सायबर फ्रोड चे वाढते प्रमाण बघता सायबर शिक्षण ही एक काळाची गरज होत चालली आहे त्याचे भान ठेऊन क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि गोगटे जोगळेकर महाविद्यालय यांच्यामध्ये एक सामंजस्य करता झाला आहे. त्या करारांतर्गत गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील मुले सायबर वॉरियर्स पार्थ मुळ्ये, वृशकेत मुळ्ये, सानिका गोंधळेकर, कौशिक मुसळे, वैष्णवी शिरसाट शिक्षक समन्वयक: केतन जोगळेकर वेगवेगळ्या शाळा किंवा महाविद्यालयामध्ये सायबर शिक्षेचे धडे देत आहेत.

यामध्ये ते वेगवेगळे दाखले देखील देतात त्यामुळे समाजात होणाऱ्या सायबर फ्रोडना आळा बसण्यासाठी मदत करत आहेत त्याच संदर्भात येथील वसंतराव भागवत माध्यमिक विद्यालय आणि कै. सौ. कमलाबाई वामन पेठे कनिष्ठ आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालयामध्ये गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सनी सायबर शिक्षणाचे सखोल ज्ञान देणारे एक सेशन घेतले त्या सेशन मध्ये येथील शिक्षक आणि विद्यार्थी यांना हे सेशन खूप आवडले. त्या सेशन मधून जी माहिती या वॉरियर्सनी येथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अंमलात आणण्याचे आश्वासन देखील यावेळी दिले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, श्री. भाऊ लकेश्री, पर्यवेक्षक श्री. विनोद पवार उपस्थित होते. व सायबर शिक्षणा चे ज्ञान ही आवश्यक आहे.व या सर्व सायबर वॉरियर्स चे फार मोलाचे कार्य आहे असे सांगितले.या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांना लाभ होईल. असे सांगितले. कार्यक्रमाचं प्रास्तविक प्राध्यापिका सौ. तन्वी भागवत यांनी केले. आणि उपस्थितांचे आभार प्राध्यापिका सौ. पौनिकर यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.